POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३१९ ● मुंबई, रविवार, २१ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

परभणी जिल्ह्यात भीषण दुर्घटना!



हनुमान मंदिराचे बांधकाम सुरू असलेल्या छत कोसळल्याने 6 जणांचा मृत्यू अन् १७ जण जखमी

मंदिराच्या गर्भगृहासमोर उभारण्यात येत असलेल्या सभामंडपाचे छत अचानक कोसळल्याने 6 जणांचा मृत्यू होऊन ठिगाऱ्याखाली अनेकजण अडकले असल्याचे समोर आले आहे. तर किमान १७ जण जखमी झाले. जखमींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू असून एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच प्रशासन, पोलीस आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली असून युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

- **जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू :** या दुर्घटनेत जखमी झालेल्या भाविकांना उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनीही मदतकार्यामध्ये सहभाग घेतला आहे. ढिगारा हटवण्यासाठी यंत्रसामग्रीचा वापर केला जात असून जखमींना तातडीने रुग्णालयात पोहोचवण्यासाठी अनेक रुग्णवाहिका घटनास्थळी तैनात करण्यात आल्या आहेत. वैद्यकीय पथकेही सज्ज ठेवण्यात आली आहेत.
- **सीसीटीव्ही व्हिडिओ समोर :** हनुमान मंदिरात झालेल्या या अपघाताचा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला आहे. यात काही भाविक दर्शन घेताना दिसत आहेत. यावेळी अचानक मंडप कोसळतो आणि ढिगाऱ्याखाली अनेक भाविक गाडले जातात. हा व्हिडिओ पाहून अनेकांच्या अंगावर काटा आला. सध्या घटनास्थळी मदतकार्य सुरू असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

परभणीच्या मानवत तालुक्यातील यशवाडीमधील हनुमान मंदिर हे प्रचंड प्रसिद्ध आहे. दर शनिवारी अनेक भाविक हनुमान मंदिरात दर्शनासाठी जातात. त्यामुळे यशवाडीतील हनुमान मंदिरात शनिवारी भाविकांची गर्दी असते. याशिवाय अनेकांना शनिवार-रविवार सुट्टी असल्याने अनेक भाविक राज्याच्या विविध भागांतून इथे दर्शनासाठी येतात.

नेहमीप्रमाणे आजदेखील अशीच भाविकांची गर्दी हनुमान मंदिराच्या परिसरात होती. याच वेळी अचानक मंदिरासमोरील सभा मंडप कोसळला. या सभा मंडपाखाली 30 ते 40 भाविक दबल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनेचं गांभीर्य ओळखून प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झालं आहे. प्रशासनाकडून तातडीने बचावकार्य सुरु झालं आहे.

घटनास्थळी पोलीस, जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, स्थानिक नेतेमंडळी घटनास्थळी दाखल झाले आहेत. घटनास्थळी रुग्णवाहिका दाखल झाल्या आहेत. ढिगाऱ्याखाली दबलेल्या भाविकांचा युद्ध पातळीवर शोध घेतला जात आहे. ढिगाऱ्याखालून काढलेल्या काही जखमींना तातडीने रुग्णवाहिकेच्या सहाय्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तसेच ढिगाऱ्याखाली दबलेल्या भाविकांचे देखील बचावकार्य केले जात आहे. क्रेनच्या सहाय्यातून बचाव कार्य केले जात आहे. नागरिकांना अनावश्यक गर्दी करु नये, असं आवाहन प्रशासनाकडून केलं जात आहे.

घटनास्थळी किंकाळ्या अन् भीती

खरंतर दर्शनासाठी आलेल्या भाविकांना आपल्यासोबत असं काही घडेल असं कधीच वाटलं नव्हतं. सभा मंडपाचं काम सुरु होतं. आज शनिवार असल्याने मंदिर परिसरात नेहमीप्रमाणे गर्दी होती. याच गदीर्तील काही भाविकांवर सभा मंडपाचा काही भाग कोसळला. हा सभा मंडप कोसळल्यानंतर मोठी खळबळ उडाली. प्रचंड आक्रोश आणि किंकाळ्या परिसरात ऐकू येऊ लागल्या. प्रचंड खळबळ उडाली. उपस्थित भाविकांनी आणि मंदिर प्रशासनाशी संबंधित काही जणांनी तातडीने बचावकार्य सुरु केले. तसेच पोलिसांनादेखील तातडीन या घटनेची माहिती देण्यात आली. घटनेची माहिती वाऱ्यासारखी पंचक्रोशीत पसरली आणि आजूबाजूच्या गावांमधून लोक बचावासाठी येऊ लागली. सध्या बचावकार्य अद्यापही सुरु असल्याची माहिती आहे.

शनिवारी भाविकांची गर्दी

हनुमान मंदिरात शनिवारी नेहमीप्रमाणे भाविकांची मोठी गर्दी होती. याचवेळी मंदिराच्या बांधकामाधीन भागातील छताचा काही भाग कोसळला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे मंदिर परिसरात एकच गोंधळ उडाला.

बचावकार्यासाठी यंत्रणा युद्धपातळीवर

घटनेची माहिती मिळताच पोलीस, महसूल प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. बचाव आणि मदतकायार्साठी पाच जड यंत्रसामग्री तसेच सुमारे ५० रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या.

"दुर्घटना नेमकी कशामुळे घडली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. बचावकार्य तातडीने सुरू करण्यात आले," अशी माहिती मानवतचे तहसीलदार पांडुरंग मोचेवाड यांनी दिली.

जड दगड भाविकांवर कोसळले

परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले की, मंदिराच्या बांधकामासाठी राजस्थानमधून आणलेल्या गुलाबी दगडांचा वापर करण्यात आला होता. हे जड दगड आधारासाठी उभारलेल्या बांबूच्या संरचनेवर ठेवण्यात आले होते. अचानक आधार कोसळल्याने हे दगड थेट भाविकांवर पडले.

स्थानिकांच्या आग्रहामुळे मंदिराचे बांधकाम सुरू असतानाही ते भाविकांसाठी खुले ठेवण्यात आले होते, अशी माहितीही त्यांनी दिली.

सीसीटीव्ही फुटेज व्हायरल

दुर्घटनेचे सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला.

पंतप्रधान मोदींकडून शोक व्यक्त

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. पंतप्रधान कार्यालयाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, "महाराष्ट्रातील परभणी येथे घडलेली दुर्घटना अत्यंत दुःखद आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो. जखमींनी लवकर बरे व्हावे, ही प्रार्थना."

मुख्यमंत्र्यांची मदतीची घोषणा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत राज्य सरकार त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

"या दुर्घटनेतील जखमींवर उपचार सुरू असून स्थानिक प्रशासन मदत आणि बचावकार्य वेगाने राबवत आहे," असेही मुख्यमंत्री म्हणाले.

एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनची प्रगती मंदावल्याने मुंबईच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या जलाशयांतील पाणीसाठा वेगाने कमी होत आहे. अप्पर वैतरणा, मोडकसागर, तानसा, भातसा आणि इतर धरणांतील घटता साठा चिंतेचा विषय ठरत असून पावसाची प्रतीक्षा अधिकच वाढली आहे.

मुंबईवर पाणीसंकट? धरणांनी धोक्याची पातळी ओलांडली

बाएमसीचा मोठा इशारा काय जाणून घ्या





मुंबईकरांसाठी सध्या प्रत्येक पावसाचा थेंब महत्त्वाचा ठरत असून मान्सूनने लवकरच जोरदार पुनरागमन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

मान्सूनच्या विलंबामुळे आणि अपेक्षित पावसाअभावी मुंबईच्या पाणीपुरवठ्याची चिंता वाढू लागली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही प्रमुख जलाशयांमधील पाणीसाठा झपाट्याने घटत असून सध्या केवळ 9.67 टक्के इतकाच साठा शिल्लक आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत परिस्थिती सुधारली नाही तर मुंबईकरांना अधिक तीव्र पाणीकपातीचा सामना करावा लागू शकतो.

मुंबई महानगरपालिका सध्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. हवामान विभाग आणि जलसंपदा विभागाच्या अहवालांचा आढावा घेतल्यानंतर पुढील दहा दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास 20 ते 25 टक्के पाणीकपात लागू करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

15 जूनपासून 10 टक्के पाणीकपात लागू

पाणीसाठ्यातील घट लक्षात घेऊन महापालिकेने 15 जूनपासून संपूर्ण मुंबईत 10 टक्के पाणीकपात लागू केली आहे. याशिवाय पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी विविध निर्बंधही लागू करण्यात आले आहेत.

17 जूनपासून बांधकाम प्रकल्पांना आणि जलतरण तलावांना दिल्या जाणाऱ्या पाणीजोडण्या बंद करण्यात आल्या आहेत. तसेच औद्योगिक, व्यापारी आस्थापना, स्पोर्ट्स क्लब आणि इतर बिगर-घरगुती वापरासाठी दिल्या जाणाऱ्या पाण्यात 20 टक्के कपात करण्यात आली आहे. या उपाययोजनांमुळे उपलब्ध पाणीसाठा अधिक काळ टिकवून ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सातही जलाशयांतील साठा चिंताजनक

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात जलाशयांवर शहराची तहान भागवण्याची जबाबदारी आहे. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनची गती मंदावली असून अपेक्षित प्रमाणात पाऊस पडलेला नाही.

त्यामुळे या सर्व धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. जलाशयांमध्ये नवीन पाण्याची आवक अत्यल्प असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. मान्सूनने लवकर जोर धरला नाही तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

29 जूननंतर परिस्थितीचा पुन्हा आढावा

महापालिका प्रशासनाने 29 जूननंतर जलाशयांतील पाणीसाठा आणि पावसाची स्थिती यांचा सविस्तर आढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्या वेळीही पाऊस समाधानकारक न झाल्यास सध्याच्या 10 टक्के कपातीमध्ये वाढ करून 20 ते 25 टक्क्यांपर्यंत पाणीकपात लागू केली जाऊ शकते.

विशेषतः उंच भाग, टेकड्यांवरील वस्त्या आणि जलवाहिन्यांच्या शेवटच्या टोकाला असलेल्या परिसरांमध्ये पाण्याचा दाब कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राखीव पाणीसाठ्याचा पर्याय अद्याप वापरलेला नाही

दरम्यान, राज्य सरकारने भातसा आणि अप्पर वैतरणा धरणांतील राखीव पाणीसाठा वापरण्यास तत्त्वतः परवानगी दिली आहे. मात्र सध्या महापालिकेने त्या साठ्याचा वापर सुरू केलेला नाही.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, जलाशयांतील एकूण पाणीसाठा सात टक्क्यांपर्यंत खाली आल्यासच राखीव साठा वापरण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. त्यामुळे पुढील काही दिवसांत होणारा पाऊस मुंबईच्या जलसंकटाचे भवितव्य ठरवणार आहे.



वाढत्या उन्हामुळे आणि 'एल-निनो'च्या प्रभावामुळे पाऊस लांबणीवर गेल्याने पिंपरी-चिंचवड शहरात 15 टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे.

धरणांत १४ टक्के पाणीसाठा

पुणे जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचे हाल होणार

राज्यात पावसाने ओढ दिल्यानंतर धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होऊ लागला आहे. पुण्यातील धरणांमध्ये ह्यजिवंतह्ण पाणीसाठा १४.३० टक्केच शिल्लक राहिला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत तो ३१.१६ टक्के होता.

■पुणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्र जलसंपदा विभागाच्या दैनंदिन अहवालानुसार, यंदा मान्सूनचे आगमन लांबल्यामुळे राज्यातील अनेक भागांत गेल्या वर्षीच्या तुलनेत पाण्याची उपलब्धता खूपच कमी आहे. राज्यातील एकूण ३,०२८ धरणे, बंधारे आणि जलाशयांमध्ये गुरुवारी एकूण 'जिवंत' पाणीसाठा २४.०३ टक्के आहे, तर गेल्यावर्षी १८ जून २०२५ रोजी हा साठा ३२.३८ टक्के नोंदवला गेला होता.

जलसंपदा विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, साठ्याची ही आकडेवारी काहीशी दिशाभूल करणारी असू शकते. कारण, २०२५ मध्ये नैऋत्य मान्सून महाराष्ट्रात नेहमीपेक्षा लवकर म्हणजेच २८ मे रोजीच दाखल झाला होता. तसेच जूनच्या मध्यापर्यंत किनारपट्टी, पश्चिम महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांत मुसळधार पाऊस झाला होता. यंदा राज्यात मान्सून सक्रिय झालेला नाही. त्यामुळे राज्याच्या प्रत्येक भागात पाणीटंचाई जाणवत आहे. या पाणीटंचाईचा मोठा फटका शेतीला बसला आहे. त्यामुळे विविध महापालिकांनी पाणी कपात सुरू केली आहे. तसेच पाणी वाचवण्याच्या अनेक योजना राबवायला प्रारंभ केला आहे. शेतकऱ्यांनी सांगितल्याशिवाय पेरणी करू नये, असे आवाहन सरकारने केले आहे.

पूर्व महाराष्ट्रात परिस्थिती चांगली

- नागपूर विभागः नागपूर विभागात ६०.५१ अब्ज घनफूट जिवंत पाणीसाठा असून तो एकूण क्षमतेच्या ३६.३१ टक्के आहे. गेल्या वर्षी हा साठा ३२.२ अब्ज घटफूट होता.
- अमरावती विभागः अमरावती विभागात ५२.०४ अब्ज घनफूट उपयुक्त पाणी असून ते एकूण क्षमतेच्या ३७.५३ टक्के आहे. हे प्रमाण गेल्या वर्षीच्या ३७.९१ टक्क्यांपेक्षा किंचित कमी आहे.

सध्या संपूर्ण राज्यात मिळून एकूण जिवंत पाणीसाठा ३४६.८२ अब्ज घटफूट आहे.

प्रादेशिक पातळीवरील पाणीसाठ्याची स्थिती

पुणे विभागः सध्या पुणे विभागात ७७.०२ अब्ज घनफूट जिवंत पाणीसाठा आहे.

- नाशिक विभागः ५२.४३ अब्ज घटफूट उपयुक्त पाणी शिल्लक आहे. जे एकूण क्षमतेच्या २४.९३ टक्के आहे. गेल्या वर्षी हेच प्रमाण ३१.७० टक्के होते.
- छत्रपती संभाजीनगर विभागः येथे ६६.८६ अब्ज घनफूट जिवंत साठा असून तो एकूण क्षमतेच्या २५.९३ टक्के आहे. गेल्या वर्षी हा साठा ३०.६८ टक्के होता.
- कोकण विभागः किनारपट्टीच्या कोकण विभागात ३७.९६ अब्ज घनफूट जिवंत पाणीसाठा आहे, जो एकूण साठ्याच्या २९.०१ टक्के आहे. गेल्या वर्षी हे प्रमाण ३६.१८ टक्के होते.

'मृत साठा' आणि 'जिवंत साठा' म्हणजे काय?

प्रत्येक धरणात काही प्रमाणात पाण्याचा साठा असतो. ज्याला 'मृत साठा' मानले जाते. हा साठा साधारणपणे कोणत्याही कारणासाठी वापरला जात नाही. या मृत साठ्याच्या वर जमा होणाऱ्या पाण्याला 'जिवंत साठा' मानले जाते.

पिंपरी-चिंचवडकरांनो पाणी जपून वापरा!

15 टक्के पाणी कपात लागू, पवना धरणाने गाठला तळ

पिंपरी-चिंचवड शहरावर अखेर जलसंकटाची मोठी कुऱ्हाड कोसळली आहे. वाढत्या उन्हामुळे आणि 'एल-निनो'च्या प्रभावामुळे पाऊस लांबणीवर गेल्याने शहरात 15 टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. या पाणी कपातीची अधिकृत अंमलबजावणी उद्यापासून केली जाणार आहे. शहराची जीवनदायिनी असणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने आटल्याने पाटबंधारे विभागाने पिंपरी-चिंचवड महापालिकेला थेट धरणातून मिळणाऱ्या पाणी साठ्यात 15 टक्के कपात करण्याचे आदेश दिले आहेत.

- **धरणातील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर :** शहराची तहान भागवणाऱ्या पवना धरणातील उपयुक्त पाणीसाठा आता अवघ्या १९ टक्क्यांवर खाली आला आहे. तर दुसरीकडे, चिखली आणि समाविष्ट भागाला पाणी पुरवणाऱ्या आंद्रा धरणातील पाणीसाठाही घटला आहे. प्रचंड उष्णतेमुळे धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत असून धरणाचे पात्र कोरडे पडू लागले आहे. सध्या उपलब्ध असलेला हा पाणीसाठा जास्तीत जास्त 31 जुलैपर्यंतच पुरेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.
- **उद्यापासून थेट धरणातून पाणी कपात :** पिंपरी-चिंचवड महापालिका दररोज पवना धरणातून रावेत येथील जल उपसा केंद्राद्वारे सुमारे 500 एमएलडी अशुद्ध पाणी उचलते. या पाण्यावर निगडी प्राधिकरणातील सेक्टर 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून संपूर्ण शहराला पुरवठा केला जातो. तसेच आंद्रा धरणातून निघोजे बंधारा येथून दररोज 90 दशलक्ष लिटर पाणी उचलून चिखली प्रकल्पात शुद्ध केले जाते. मात्र, आता थेट धरणातूनच 15 टक्के कपात होणार असल्याने शहरात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात मोठी घट होणार आहे.
- **पाण्याचं संकट गडद :** पिंपरी-चिंचवड शहरात आधीच 2018 पासून दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिक आधीच विस्कळीत पाणीपुरवठ्याने हैराण आहेत. त्यातच आता धरणातील पाणीसाठा आटल्याने आणि पाटबंधारे विभागाच्या नवीन आदेशांमुळे शहरवासीयांचे हाल अधिक वाढणार आहेत. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आणि पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन केले आहे.

गोवंडीतील एका बालरोगतज्ञाच्या रुग्णालयावर एफडीएची धडक कारवाई पाहायला मिळाली आहे. येथे सुरु असलेल्या प्रकारानंतर पालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. याठिकाणाहून ९ लाखांचा औषधसाठा जप्त करण्यात आला आहे.

गोवंडीतल्या बालरुग्णालयात नेमकं काय सुरु होतं?

एफडीएच्या छाप्यानंतर उघड झालं धक्कादायक सत्य

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील गोवंडी परिसरातील एका बालरोगतज्ञाच्या रुग्णालयावर अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई करत परवान्याविना सुरू असलेली ॲलोपॅथिक औषधविक्री उघडकीस आणली. तपासणीदरम्यान सुमारे ९.०९ लाख रुपयांचा औषधसाठा आणि विक्रीसाठी वापरले जाणारे बिल बुक जप्त करण्यात आले. या प्रकरणामुळे आरोग्य क्षेत्रात खळबळ उडाली आहे. नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण आणि औषधांची कायदेशीर विक्री सुनिश्चित करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत १८ जून रोजी गोवंडी पूर्व येथील मुस्कान एनआयसीयू ॲण्ड चिल्ड्रन हॉस्पिटलची तपासणी करण्यात आली. तपासणीत रुग्णालयाचे संचालक डॉ. निलेश शाह यांनी दोन स्वतंत्र खोल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथिक औषधांचा साठा करून ठेवल्याचे आढळले. विशेष म्हणजे वैध औषध विक्री परवाना नसतानाही रुग्णालयातील बारावी उत्तीर्ण रिसेप्शनिस्टमार्फत औषधांची विक्री केली जात असल्याचे समोर आले.



बिलांमध्येही गंभीर त्रुटी

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी तपासणीदरम्यान औषधविक्रीसाठी वापरले जाणारे बिल बुकही जप्त केले. या बिलांमध्ये रुग्णाचे नाव, औषधाचे नाव आणि रक्कम याशिवाय इतर महत्त्वाचे तपशील नमूद करण्यात आले नव्हते. औषधांचा बॅच क्रमांक, उत्पादन दिनांक, मुदत समाप्ती दिनांक तसेच उत्पादकाची माहिती अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले.

अधिकाऱ्यांच्या मते, ही बाब ग्राहक संरक्षण आणि औषध विक्रीसंदर्भातील कायदेशीर नियमांचे उल्लंघन करणारी आहे. तसेच औषधविक्रीसाठी आवश्यक तांत्रिक किंवा वैधानिक पात्रता नसलेल्या व्यक्तीकडून हे काम करून घेतले जात असल्याचेही स्पष्ट झाले.

९ लाखांहून अधिक किमतीचा साठा जप्त

या कारवाईत एकूण ९ लाख ९ हजार २१५ रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला. अन्न व औषध प्रशासनाने पुढील तपास सुरू केला असून संबंधितांविरोधात औषधे व प्रसाधने अधिनियम १९४० आणि त्याअंतर्गत नियमांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

आयुक्त तुकाराम मुंढेंचा इशारा

रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. परवान्याविना औषधविक्री, अपात्र व्यक्तींमार्फत औषध वितरण किंवा कायदेशीर नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तांनी दिला आहे. नागरिकांनी औषधे केवळ परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावीत आणि प्रत्येक खरेदीवेळी वैधानिक तपशील असलेले बिल घ्यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

टवाळखोर, तळीराम खबरदार, सार्वजनिक ठिकाणी दिसाल तर...

अंबड पोलिसांचा धडाका... 74 जणांवर कारवाई

■नाशिक। प्रतिनिधी,

सार्वजनिक ठिकाणी टवाळक्या करणे, उघड्यावर मद्यपान करून नागरिकांना त्रास देणे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या प्रवृत्तींविरोधात अंबड पोलिसांनी विशेष मोहीम राबवून ७४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगवेंद्रसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली चार अधिकारी व २२ पोलीस अंमलदारांच्या पथकाने अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिडको रुग्णालय परिसर, त्रिमूर्ती चौक, दत्त मंदिर चौक, माऊली लॉन्स परिसर तसेच विविध वाईन शॉपलगतच्या भागात तपासणी मोहीम राबविली. या ठिकाणी विनाकारण गर्दी करून बसणे, येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांची छेड काढणे, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणे तसेच संशयास्पद हालचाली करणाऱ्यांची कसून पडताळणी करण्यात आली.

या कारवाईदरम्यान ७४ जणांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यांच्यावर कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. तसेच उघड्यावर मद्यपान, टवाळक्या किंवा नागरिकांच्या सुरक्षिततेला बाधा पोहोचविणारे कृत्य करणाऱ्यांविरुद्ध कठोर भूमिका घेतली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

माहिती अधिकाराचे वास्तव!



पंजाबमधील गुरुदासपूरमधील बाटला येथे एका रस्त्याचे काम चालू असतांना २ माहिती अधिकार (आर.टी.आय.) कार्यकर्त्यांनी तिथे उपस्थित अधिकाऱ्याला धमकावून मजुरांशी चुकीचे वर्तन केले. कदाचित् अधिकाऱ्याकडून त्यांना काही 'लाभ' अपेक्षित असेल. अधिकाऱ्याने त्या कार्यकर्त्यांच्या विरोधात तक्रार प्रविष्ट केल्याने त्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आणि त्यांचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने नुकताच नाकारला. या वेळी न्यायालय म्हणाले, ''प्रत्येक सूत्रासाठी माहिती अधिकाराखाली कागदपत्रे मिळवणे हा व्यवसाय झाला आहे.'' 'त्या रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाला आहे', असे त्या कार्यकर्त्यांचे म्हणणे होते आणि त्यांच्या अधिवक्त्याने म्हटले की, तो भ्रष्टाचार बाहेर न येण्यासाठीच या कार्यकर्त्यांना पकडले आहे. 'देशात कुठल्या रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार होत नाही?', असे म्हणण्याजोगी स्थिती खरोखरच आहे, हे कुणीही नाकारणार नाही. त्यामुळे याही रस्त्याच्या कामात तो कदाचित् झालेला असूही शकतो; मात्र इथे माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा प्रशासकीय अधिकाऱ्यावर दबाव आणून स्वार्थ साधण्याचा कुटील हेतू लपून रहात नाही आणि तोच आक्षेपार्ह आहे. त्यामुळे न्यायालयाने त्यांचा जामीन नाकारतांना म्हटले, 'जर सरकारने धन दिले आहे, तर रस्त्याच्या गुणवत्तेकडे सरकार बघेल. रस्त्याच्या प्रगतीवर पाळत ठेवणारे तुम्ही कोण आहात?' सामाजिक कार्यकर्त्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळेच सरकारनेच कायद्याच्या माध्यमातून जनतेला त्याच्यावर वचक ठेवण्याचा दिलेला अधिकार एक प्रकारे येथे हिरावला गेला! या प्रकरणातील पूर्ण सत्य ठाऊक नसले, तरी जी माहिती वृत्तांमधून आली आहे, त्या आधारावर तर असेच म्हणावे लागेल. एखाद्याला भ्रष्टाचार उघड करायचा आहे, तर तो प्रशासनाला निवेदन किंवा पत्र देईल, माध्यमांना मुलाखत देईल, सामाजिक माध्यमाचा वापर करील, बातमी देईल, अगदी आंदोलनही करील; पण जिथे काम चालू आहे, त्यात अडथळा आणून नेमके काय साध्य होणार आहे? त्यामुळे कार्यकर्त्यांच्या हेतूविषयीचा संशय बळावतो. त्यामुळे या प्रकरणी न्यायालयाने म्हटले की, कार्यकर्त्यांना 'समांतर चौकशी यंत्रणा चालवण्या'चा अधिकार दिलेला नाही. वर्ष २०११ मध्ये एका प्रकरणाचा निकाल देतांना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते, 'माहिती अधिकार हा कायदा सरकारी अधिकाऱ्यांना घाबरवण्यासाठी किंवा त्यांना कामापासून परावृत्त करण्यासाठी नाही.' 'माहिती अधिकार कार्यकर्त्या'कडेही लोक 'पैसे खाणारा' अशा अर्थाने पहातात, ही वस्तूस्थिती आहे. रवींद्र बऱ्हाडे या पूर्वी अनेक प्रकरणे बाहेर काढणाऱ्या माहिती अधिकार कार्यकर्त्याच्या विरोधात पुणे पोलिसांत १२ गुन्हे नोंद झाले आणि पुणे पोलिसांनी त्याच्यासह त्याच्या ३२ साथीदारांना वर्ष २०२१ मध्ये अटक केली. त्यांना मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा) लावण्यात आला. त्यांच्याकडे २ सहस्र कोटी रुपयांहून अधिक संपत्ती असल्याचे बोलले गेले. अशा प्रकरणांमुळे काही प्रामाणिक कार्यकर्त्यांचीही अपकीर्ती झाली आहे. काही जण म्हणतात बर्हाडे आणि त्याचे साथीदार यांच्या विरोधातील तक्रारी खोट्या आहेत; कारण आतापर्यंत त्यांनी ३ सहस्र अवैध बांधकामांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका प्रविष्ट केल्या आहेत. यामागील सत्य काळाच्या ओघात समोर येईलच! आणखी एक गंभीर गोष्ट म्हणजे काहींनी माहिती अधिकाराचा पीत पत्रकारितेसाठी वापर केला. बांधकाम व्यावसायिकांवर दबाव आणून मोठमोठे 'फ्लॅट' मिळवायचे, हा असे तथाकथित पत्रकार किंवा सामाजिक कार्यकर्ते यांचा धंदा झाला. काही वेळा क्लिष्ट अर्ज करून संबंधित अधिकाऱ्याला त्रास देण्याचाही कुटील हेतू असल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले. ही सर्व माहिती शोधण्यात आणि ती संबंधितांपर्यंत पोचवण्यात अधिर्कायाचा वेळही जातो. त्यामुळे खरोखरच त्या माहितीतून अभ्यास होऊन काही सकारात्मक साध्य होणार असेल, तर ठीक आहे, अन्यथा तो सरकारी अधिकाऱ्याच्या वेळेचा प्रचंड अपव्ययच ठरतो; त्याचा परिणाम प्रशासकीय कामकाजावर होतो. सरकार ही माहिती जवळजवळ विनामूल्य उपलब्ध करून देत असल्यामुळेही अशा स्वार्थी लोकांचे फावले. माहिती अधिकाराचा कायदा मुळात बनवला गेला अशासाठी की, प्रशासनासह प्रत्येक सरकारी कारभारात पारदर्शकता रहावी आणि त्या माध्यमातून जनतेचा प्रशासन किंवा शासन यांच्यावर एक प्रकारे अप्रत्यक्ष वचक राहून सर्व कारभार सुरळीत आणि दायित्वाने व्हावा. कालांतराने स्वार्थी कार्यकर्ते आणि पत्रकार याचा अपलाभ घेऊन संबंधित भ्रष्टाचाऱ्यांना धमकावून स्वतःच्याच तुंबड्या भरू लागले. त्यामुळे 'सुक्यासमवेत ओलेही जळते कि काय?' अशी स्थिती झाली आहे. माहिती अधिकार कायद्याच्या अंतर्गत माहिती मिळवून अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार यांनी आतापर्यंत खरोखरच उत्तम काम केले अन् शासनाचा भ्रष्टाचार किंवा गैरकारभार उघडकीस आणला. वर्ष २०१३ मध्ये तळेगाव दाभाडे येथील एका प्रकरणात भ्रष्टाचार बाहेर काढणाऱ्या माहिती अधिकार कार्यकर्त्याला न्याय मिळण्यासाठी झालेली कायदेशीर लढाई ही मोठी मानली जाते. येथील सतीश शेट्टी या कार्यकर्त्याने अनेक भूमी घोटाळे बाहेर काढल्याने त्यांची हत्या करण्यात आली होती. माहिती अधिकार कायद्याच्या गैरवापरावर सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये आणि केंद्रीय माहिती आयोग (सीआयसी) यांनी वेळोवेळी अत्यंत सखोल चचार्ही केली आहे. वरील सर्व कारणांमुळेच आता सरकारने या माहितीसाठी काही किंमत आकारणे चालू केले आहे. 'माहिती कुठल्या कारणासाठी हवी आहे? हे जर अर्जात नमूद केले, तर ती माहिती देण्यात वेळ घालवायचा कि नाही?' हे ठरवता येईल', असे काहींना वाटते; परंतु यामुळे जिथे खरोखरच भ्रष्टाचार किंवा अपप्रकार चालू आहेत, ते बाहेर येण्यास अडचणीही निर्माण होऊ शकतात. अन्य एक उपाय म्हणजे 'ज्या व्यवहारांमध्ये भ्रष्टाचार होण्याची शक्यता असते किंवा पारदर्शकता आवश्यक आहे', असे जनतेला वाटते, अशा सर्व गोष्टी, उदा. निविदा, जमा-खर्च आदी संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर दिल्या, तर जनतेला संशय घ्यायला वाव न्यून राहील. 'निरर्थक माहिती अर्ज फेटाळण्याचा अधिकार द्यायचा का?' याविषयी चर्चा चालू असते; परंतु त्यामुळे कुणी योग्य अधिकारापासून वंचितही रहायला नको. विजय कुंभार या माहिती अधिकार कार्यकर्त्याने माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे संघटन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पुण्यात या कार्यकर्त्यांसाठी ग्रंथालयही उभारले आहे. माहितीचा अधिकार सुशासनाचे आणि त्या माध्यमातून सुराज्याचे स्वप्न साकार करण्याचे एक उत्तम माध्यम आहे; परंतु भारतासारख्या देशात त्याही माध्यमाचा स्वाथार्साठी वापर झाला आहे. माहिती अधिकाराचा योग्य वापर हा आदर्श राज्याच्या स्थापनेसाठी झाल्यास त्याचा खरा हेतू साध्य होईल!

कोण म्हणतो टक्का दिला...

राज्यात सध्या सगळीकडे आंदोलनांचा भडका उडाला आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी विठूरायाच्या चरणी बसून अन्नत्याग आंदोलन झाले. जिल्ह्याजिल्ह्यात रास्तारोको, चक्काजाम तर कुठे ट्रॅक्टर मोर्चा निघाला. ऐन उन्हाळ्यात विजेचा लपंडाव राज्याच्या राजधानीतही सुरू आहे. नवी मुंबईत महावितरणविरोधात सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनीच मोर्चा काढला. अधिकाऱ्यांवर बांगड्या भिरकावल्या. तर मराठवाडा, विदर्भात स्मार्ट मीटरच्या मेसेजने धुमाकूळ घातला आहे. याविरोधातही लोक रस्त्यावर उतरताना दिसत आहेत. भलेही त्यांचा विरोध मूठभर असेल मात्र लोक रस्त्यावर येत आहेत. कोल्हापूरमध्ये महाराष्ट्रातील ठेकेदारांचे अधिवेशन झाले.

गेल्या दशकभरापासून राज्यातील कंत्राटदारदेखील आंदोलनाच्या मोडमध्ये आले आहेत. सरकार ठेकेदारांच्या माध्यमातून विकासकामे तर करून घेत आहे, मात्र त्यांच्या कष्टाच्या कमाईचा मोबदला वेळेवर दिला जात नाही, अशी सध्याची परिस्थिती आहे. याविरोधातच कोल्हापुरातील महाअधिवेशनात ठेकेदारांनी आवाज बुलंद केला. ठेकेदार तथा कंत्राटदारांची प्रतिमा जनमानसात फारशी उजळ नाही. ठेकेदारांचे लागेबांधे सत्ताधाऱ्यांसोबत विरोधातील नेत्यांसोबतही तेवढेच अर्थपूर्ण असल्यामुळे त्यांच्या रुदालीला सामान्य लोक फार गांभीर्याने पाहात नाही. गेल्या दशकभरापासून सत्तेसोबत साटंलोटं असलेल्या ठेकेदारांनाही आता रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. कित्येक वर्षांपासून ठेकेदारांची देयके सरकारने थकवली आहेत. यामुळे कधीकाळी मंत्री, आमदारांच्या मांडीला मांडी लावून बसणारे आता सरकारविरोधात बोलायला लागले आहेत. आता सरकारविरोधात बोललंच पाहिजे, नाही तर आपली मुलं उद्या रस्त्यावर येतील ही भीती त्यांना सतावत आहे.



२०२४ मध्ये सत्तारुढ झालेल्या सरकारला आता दीड वर्षे होत आली आहे. अधिवेशनामध्ये आणि मंत्रिमंडळ बैठकीत सरकारकडून आश्वासनांचा पाऊस पाडला जातो. प्रत्यक्षात सरकारची गंगाजळी रिकामी असल्याचे कंत्राटदारांच्या बोंबांवरून लक्षात येत आहे. सरकारच्या सार्वजनिक बांधकाम, जलजीवन मिशन व महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पर्यटन विकास महामंडळ, नगरविकास विभाग विशेष निधी कामे, जलसंपदा विभाग आणि जिल्हा नियोजन समिती व इतर विभागांची हजारो कोटींची बिलं थकित आहेत. ही बिलं मंजूर करण्यासाठी ठेकेदारांना मोठ्या प्रमाणावर कमिशन द्यावे लागत असल्याचा गौप्यस्फोट कोल्हापुरातील अधिवेशनात ठेकेदारांनी केला. त्यांनी आमदार, खासदार, सरकारी अधिकारी यांना किती-किती टक्केवारी द्यावी लागते आणि त्यानंतर पुन्हा काम चांगले झाले नाही म्हणून सत्ताधाऱ्यांच्या शिव्याही खाव्या लागतात या दुष्टचक्राची उजळणी केली.

राज्यातील ठेकेदारांची परिस्थिती एकूणच गंभीर झालेली आहे. याआधीच्या अधिवेशनांमध्ये विरोधकांनी सरकारकडे ठेकेदारांची बिलं देण्यासाठी पैसे नसल्याचे सत्य उघड केले, मात्र त्यावर पद्धतशीर पडदा मंत्र्यांकडून आणि मुख्यमंत्र्यांकडून टाकण्यात आला. कोंबडं कितीही झाकलं तरी सूर्य उगवल्याशिवाय राहात नाही, तसे नागपूर आणि सांगलीच्या ठेकेदारांनी केलेल्या आत्महत्यांमुळे राज्यातील ठेकेदारांची स्थिती समोर आली. मुख्यमंत्र्यांच्या गृहजिल्ह्यातील पी. व्ही. वर्मा या कंत्राटदाराने गेल्या वर्षी आत्महत्या केली. वर्मा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात कोट्यवधींची कामे केली. त्यांची ४० कोटींहून अधिकची सरकारी बिलं थकल्यामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. वर्मा हे काही नवीन ठेकेदार नव्हते. साठी पार केलेल्या या कंत्राटदाराचे दक्षिणेतील अभिनेता प्रभाससोबत कौटुंबिक नाते होते. गेल्या चार दशकांपासून ते या व्यवसायात होते. तरीही ठेकेदाराला आत्महत्या करण्याची वेळ येत असेल तर त्यांची आर्थिक स्थिती किती गंभीर झाली याचा अंदाज येतो. सांगलीमध्ये हर्षल पाटील या तरुणाने नोकरीपेक्षा उद्योग करावा या उद्देशाने सरकारी कामे करण्यास सुरुवात केली. या तरुण कंत्राटदाराचे सरकारकडे १ कोटी ४० लाख रुपये थकले.

सरकारकडून पैसे मिळण्याची कोणतीच आशा दिसत नसल्यामुळे या तरुण अभियंत्याने मृत्यूला कवटाळले. सरकारच्या भ्रष्ट यंत्रणेचा हा तरुण कंत्राटदार बळी ठरला. शासनाकडून पैसे काढायचे तर अधिकार्यांना टक्केवारी दिल्याशिवाय बिल मंजूर होत नाही. त्यातून पुन्हा आमदार, खासदार यांची टक्केवारी वेगळी. या सर्व भ्रष्टाचाराला कंटाळून त्याने आत्महत्या केल्याचे आरोप गेल्यावर्षी विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात केले. मात्र सरकार ढिम्म आहे. ठाणे पालिकेतील टक्केवारी नंदलाल समितीने उघड केली होती. ४१ टक्क्यांपर्यंत कमिशन उपटले जात होते. आजही या परिस्थितीत बदल झालेला नाही. दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख नेहमी म्हणत, 'स्टँडिंगमधील अंडरस्टँडिंग' सर्वांना माहीत आहे. यावरून राज्यातील टक्केवारीचे गणित कळायला सोपे होते.

नेमेचि येतो मग पावसाळा याप्रमाणे पुढील आठवड्यात राज्याच्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे. तोपर्यंत विधान परिषदेच्या बिनविरोध शिवाय राहिलेल्या निवडणुकाही पार पडतील. त्यातही सरकारचे आमदारच अधिक असणार असेच सध्याचे वातावरण आहे. कारण ज्या जिल्ह्यात सध्या लोक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत, त्यांचे नगरसेवक गोव्यात पुल पार्टी आणि समुद्रात मौजमस्ती करण्यात व्यग्र आहेत. या नगरसेवकांचा खर्च कोण करत आहे, हा प्रश्न तसा अनाठायीच. कारण राज्यात सध्या विधान परिषदेच्या निवडणुका आहेत आणि उमेदवारी अर्ज मागे घेतलेले विरोधी पक्षाचे उमेदवार म्हणतात की आम्हाला मतदार भेटत नाहीत. ते सध्या तीर्थयात्रेला गेले आहेत. या कडक उन्हाळ्यात नगरसेवकांची तीर्थयात्रा कुठे सुरू आहे, हे सध्या लोक पाहात आहेत. असे लोकप्रतिनिधी आणि राज्यकर्ते ज्या जनतेला आणि ठेकेदारांना मिळाले असतील त्यांचं कोण भलं करणार? पण सरकारी कंत्राटदारांनी आता आवाज बुलंद केला आहे. टक्केवारीने छळलेल्या या वर्गाला आता जाग आली, हेही कमी नाही.

हा तर मुख्यमंत्र्यांचा अपमान



लातूरच्या बोंबळी खुर्द गावातील काशीनाथ गायकवाड या भूमिहीन शेतमजुराकडील बैलजोडीतील एका बैलावर वीज पडून तो दगावला. त्यानंतर एकच बैल त्याच्याकडे असल्याने औताच्या दुसऱ्या बैलाच्या जागी तो त्याच्या पत्नीला जुंपतो. शेत नांगरायला सुरुवात करतो. याची सर्वच प्रमुख प्रसार आणि समाजमाध्यमांमध्ये बातमी होते. बैलाच्या जागी जुंपलेल्या गरीब शेतकरी महिलेमुळे बातमीला मानवी संवेदनशीलतेचे मूल्य मिळते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत ही बातमी पोहोचलेली असते. मुख्यमंत्री जिल्हा प्रशासनाला आदेश देतात. थेट मुख्यमंत्र्यांकडून काशीनाथ गायकवाड या गरजू शेतकऱ्याला एक बैल दिला जातो. यापुढे मुख्यमंत्री किती संवेदनशील आहेत, त्यांनी गरीब शेतकऱ्याला कसा बैल उपलब्ध करून दिला, याचे सत्ताधारी पक्षाकडून सरभरीत वर्णन माध्यमांवर केले जाते. पण मिळालेला बैल आणि शेतकऱ्याचे हाल संपलेले नसतात. 'मुख्यमंत्र्यांचा बैल' औताला जुंपताच आजारी असल्याने शेतातच पेंगुळून खाली बसतो. राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून मिळालेला हा बैल आजारी आणि मरतुकडा असतो. त्यामुळे गरजू शेतकऱ्यावर स्थानिक प्रशासनाच्या या 'बैलबुद्धी' कारभारामुळे मदत नको पण 'बैल' आवर म्हणण्याची वेळ येते. आता आधी 'संवेदनशील' ठरलेल्या मुख्यमंत्र्यांवर कठोर टीका होऊ लागते. शेतकऱ्याला आजारी आणि कुचकामी 'बैल' दिल्याचे उघड होते. आता हा 'बैल' स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायतीमधील भ्रष्टाचाराचे कुरण चरून रवंथ करत ढिम्म बसलेल्या बैलासारख्या व्यवस्थेचे प्रतीक बनतो.या पहिल्या अंकानंतर पुन्हा नवा बैल शेतकऱ्याला दिला जातो. 'जुना बैल कुचकामी निघाला, नवा बैल मारकुटा निघायला नको' अशी टीका करण्याची संधी विरोधकांना मिळते.

या सर्व 'बैलबुद्धीच्या' प्रशासकीय गदारोळात अल्पभूधारक, भूमिहीन आणि पशुधन नसलेल्या शेतकऱ्यांची प्रशासनाकडून होणारी अवहेलना, थट्टाच समोर येते. वस्तुतः कुठल्याशा एखाद्या खेड्यातल्या भूमिहीन शेतकऱ्याला बैल मिळवून देणे, हे मुख्यमंत्र्यांचे कामच नाही. इतक्या किरकोळ कामात मुख्यमंत्र्यांना लक्ष घालावे लागणे, हे ग्रामपंचायत व्यवस्था या कुचकामी बैलापेक्षा किती कुचकामी आणि ढिम्म आहे, हे स्पष्ट होते. राज्य आणि केंद्राकडून गरीब शेतकऱ्यांसाठी विविध योजनांतून कोट्यवधींचा निधी येतो तो नेमका जातो कुठे? हा प्रश्नही या निमित्ताने पुन्हा समोर येतो. लातूरमधील बैलाचे उदाहरण हे महाराष्ट्रातील संपूर्ण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील भ्रष्टाचार आणि बेपर्वाईचे प्रातिनिधिक परंतु स्पष्ट असे उदाहरण आहे. यातून तीन गोष्टी समोर येतात. पहिली, शेतकऱ्यांसाठी सरकारकडून योजना, धोरण, मदत जाहीर होते. दुसरी, जिल्हास्तरावरून मदतीचे आदेश निघतात. तिसरी, स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात ग्रामपंचायतींकडे संबंधित योजना, आदेश, मदतीचे प्रत्यक्ष अंमलबजावणीचे अधिकार असतात. मात्र गरजूंपर्यंत प्रत्यक्ष पोहचेपर्यंत धोरण किंवा मदत या व्यवस्थेतील बैलासारखीच मरतुकडी होते. बरेचदा शेतकऱ्यांना सरकारकडून पाठवलेला अनुदानित मदतीचा बैल सुदृढच असतो. त्याच्या वाटणीचे चारापाणी सरकारी मदतीचा बैल पोहोचवणाऱ्या व्यवस्थेकडून मधल्यामध्येच खाल्ले जाते. मग उरलेला कुपोषित बैल शेतकऱ्यांच्या ताब्यात दिला जातो. पीककर्ज, खते, पाणी, सिंचन योजना, वीज, बियाणे, पशुधन, शेततळे, हमीभाव, दुष्काळी निधी, अनुदान, उत्पादनाची बाजारपेठ आदी मदतीचे बैल दरवर्षी सरकारकडून गरजू शेतकऱ्यांसाठी पाठवले जातात. परंतु मध्यल्यामध्येच या बैलांच्या हक्काच्या चार्याचे कुरण व्यवस्थेकडून फस्त केले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील माणसाच्या रुपातले 'बैल' अशी कुरणे चरून गबर होत जातात. पुढे पुढे असे 'उन्मत्त' बैल अधिकाधिक ढिम्म आणि सुस्त होत जातात. या बैलाला जागे करायला पशुधन विकास अधिकारी, ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, ग्रामविकास, कृषी अधिकारी, तहसील अधिकारी, तसेच जिल्ह्याचे प्रशासकीय अधिकारी असे कित्येक 'गुराखी' व्यवस्थेत असतात. सरकारी मदतीचा बैल भ्रष्टाचाराच्या उकिरड्यावर जाण्यापासून रोखण्याचे काम या गुराख्यांचे असते. परंतु ज्या ठिकाणी बैल आणि भ्रष्टाचारी कुरणातल्या गवताची बेकायदा मैत्री होते, त्या ठिकाणी मग ढिम्म व्यवस्थेला उठवण्यासाठी हातात कारवाईची काठी घेऊन मुख्यमंत्र्यांनाच शेतकऱ्याच्या बांधावर यावे लागते. सरकारच्या मंत्रीपदावर बसलेले 'बैल', 'नोकरशाहीतील बैल', 'प्रशासकीय व्यवस्थेतील बैल', विरोधी पक्षातील अंगावर येणाऱ्या 'बैलां'ना रोखण्यातच मुख्यमंत्र्यांची ताकद खर्ची पडत असते. अशा वेळी ग्रामपंचायतीमधील गरजू शेतकऱ्याला 'बैल' पुरवण्यासाठीही मुख्यमंत्र्यांना स्वतः लक्ष घालावे लागत असेल तर ग्रामीण प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी नावाचे 'बैल' करतात काय, असा प्रश्न पडतो.

लातूरच्या घटनेत मुख्यमंत्र्यांनी पाठवलेला एक आजारी बैलच शेतात खाली बसला नाही. मरतुकडी प्रशासकीय यंत्रणा, भ्रष्टाचाराच्या आजाराने 'भस्म्या' रोग झालेल्या ग्रामपंचायती, कुपोषित व्यवस्थाही ढिम्म सुस्त होऊन केव्हाचीच खाली बसली आहे. शेतकऱ्याच्या वाटणीचा निधी चरून माजलेले हे वळू भ्रष्टाचाराची कुरणेच्या कुरणे फस्त करत सुटले आहेत. आता मुख्यमंत्र्यांनी या वळूंनाही वेसण घालायला हवी किंवा निदान कारवाईची काठी तरी उगारायला हवी. अन्यथा हे माजलेले भ्रष्टाचाराचे वळू उरलं-सुरलं कुरणही संपवून टाकतील, हेच खरे. एखाद्या गावातील व्यक्तीला कुठली समस्या असेल तर सर्वात प्रथम त्या गावच्या सरपंचाने मदतीला धावून जायला हवे, त्यानंतर जिल्हा प्रशासनाने त्यात लक्ष घालायला हवे. गरीब शेतकर्यांला बैल देण्यासाठी जर मुख्यमंत्र्यांना धाव घ्यावी लागत असेल तर तो मुख्यमंत्र्यांचा मोठेपणा नाही तर अपमान आहे. त्यांनी संबंधित गावच्या सरपंच आणि जिल्हा परिषदेवर कारवाईचे आदेश द्यायला हवे. तरच स्थानिक स्वराज्य संस्था जाग्या होतील, अन्यथा, दर वेळी मुख्यमंत्र्यांनाच बैल उपलब्ध करून द्यावा लागेल.

कोटींच्या लाखाची गोष्ट



'स्पेसएक्स' कंपनीच्या समभागांची विक्री आणि त्यांच्या मूल्यवर्धनातून उद्योगपती एलन मस्क यांची संपत्ती एक लाख कोटी डॉलरहून अधिक झाल्याने जगातील पहिले 'ट्रिलियनियर' म्हणून त्यांच्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांचे हे यश म्हणजे तंत्रज्ञानाच्या आधारे नवनिर्मिती, बुद्धिमत्ता-संशोधनाला दिलेली कष्टांची जोड, जिद्द, दूरदृष्टी आणि जोखीम पत्करण्याचे धाडस अशा विविध गुणांचा संगम आहे. त्यातूनच जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांपेक्षा अधिक संपत्तीचे ते धनी बनले.

पारंपरिक विचारांचे ओझे टाकून नव्या मागार्ने केलेल्या वाटचालीत त्यांनी गाठलेला हा टप्पा साऱ्या जगासाठी प्रेरणादायी आहेच; तसेच आकर्षक परताव्याच्या आशेने लाखो गुंतवणूकदारांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास, ही या घटनाक्रमातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट ठरावी. आजवर केवळ विज्ञानकथांमधूनच शोभाव्यात, अशी कृत्रिम प्रज्ञा, विजेवर चालणारी वाहने किंवा अंतराळातील प्रवास आणि वस्ती अशा अनेक बाबी मानवाच्या आवाक्यात येत आहेत.

नव्या युगातील बदलांचा कल्पनेपलीकडचा वेग पाहता त्या कोणत्याही क्षणी आपल्या दाराशी येणार आहेत; त्यामुळे या नव्या वास्तवाची दखल केवळ अमेरिकाच नव्हे, तर जगातील प्रत्येकाने घेतली पाहिजे. केवळ एका व्यक्तीच्या यशापुरते त्याचे मोजमाप करता येणार नाही, तर त्यांच्या 'टेस्ला', 'स्पेसएक्स' आणि 'न्यूरलिंक' या भविष्यकाळातील तंत्रज्ञानाबाबत नागरिकांना किती आशा आहेत, हेच यातून द्गोच्चर होते. अर्थात, एवढ्या प्रचंड संपत्तीचे एका व्यक्तीकडे होणारे केंद्रीकरण आणि जगभरातील विषमता हीसुद्धा बदलत्या काळात धोरणकर्त्यांनी गांभीर्याने विचार करावा, अशीच बाब आहे.

'लक्ष्मीकडे लक्ष्मी जाते,' तद्वतच थोडे पैसे असलेले लाखो गुंतवणूकदार प्रचंड संपत्ती असलेल्यांकडे आपला पैसा सोपवतात आणि त्या भांडवलातून ही संपन्न मंडळी गुंतवणूकदारांना परतावा देऊन आपल्याही संपत्तीमध्ये अब्जा-अब्जांनी भर घालतात, हे पूर्वीपासून आढळते. मात्र, केवळ एलन मस्कच नव्हे, तर वर्तमान जगातील पहिल्या दहा श्रीमंतांपैकी बहुतेक सर्व नव्या तंत्रज्ञानावर स्वार झालेल्या उद्योगांचे धनी आहेत. मस्क हेसुद्धा विजेवरील वाहने, उपग्रह आणि कृत्रिम प्रज्ञा या नव्या क्षेत्रात भ्रमंती करणारेच आहेत. मळलेल्या वाटांवर यश मिळवणाऱ्यांच्या पाठीमागे धावण्याऐवजी त्यांनी अशक्यप्राय स्वप्ने पाहिली.

नव्या कल्पना मांडून न थांबता त्यांचा अथक पाठपुरावा केला. कधी काळी तेही अपयशाच्या कडेलोटापर्यंत पोहोचले होते; पण त्यांचा नवनिर्मितीचा ध्यास कायम राहिला. त्यातूनच व्यवस्थापनशास्त्रातील 'ब्लू ओशन थिअरी'नुसार स्पर्धेपलीकडे जाऊन नव्या क्षितिजांवर विहार केला आणि त्यातूनच आपले साम्राज्य उभे केले, हे ध्यानात घ्यावे लागेल. आता 'स्पेसएक्स'च्या 'आयपीओ'तून उभारलेले भांडवलही ते 'ऑर्बिटल डेटा सेंटर', चंद्रावरील कारखाना आणि मंगळ मोहीम अशा नव्या उपक्रमांतच गुंतवणार आहेत. मानवी बुद्धीच्या उड्डाणांना अंतराळाच्याही मर्यादा राहिलेल्या नाहीत, याचेच हे द्योतक म्हणावे लागेल.

बदलत्या काळात नव्या कल्पना आणि संशोधनाचे महत्त्व यातून लक्षात येते. भारतातील सद्यस्थिती पाहता, संशोधन आणि विकासामध्ये सरकार आणि उद्योगजगतालाही मोठी मजल मारावी लागणार आहे. सक्षम मनुष्यबळ घडवणे,ही त्याची पहिली पायरी आहे. त्यासाठी शिक्षण आणि त्यातही मूलभूत विज्ञान-तंत्रज्ञानाच्या शिक्षणावर अधिकाधिक भर द्यावा लागेल.

करियरच्या पारंपरिक वाटांबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळसंशोधन, सेमीकंडक्टर अशी नवी क्षेत्रे काबीज करण्यासाठी नव्या पिढीला उद्युक्त करावे लागेल. मस्क यांनी गाठलेले हे स्थान कौतुकास्पद आहेच; मात्र विख्यात लेखक मारिओ पुझो यांनी 'गॉडफादर' कादंबरीत अमर केलेल्या 'प्रत्येक नेत्रदीपक उत्कर्षामागे काही गुन्हा असतो,' या वचनाप्रमाणे मस्क यांच्या यशालाही नियमांचे उल्लंघन, गैरप्रकार, कृष्णवर्णीयांशी भेदभाव आणि युद्धांमधील संशयास्पद भूमिका अशा कृत्यांची काळी किनार आहेच. असे धनाढ्य विविध देशांच्या धोरणांवर दबाव-प्रभाव टाकत असून, जागतिक राजकारणातील त्यांच्या हस्तक्षेपाचे अनुभवही नवे नाहीत. अनेक देशांच्या 'जीडीपी' पेक्षा अधिक संपत्तीचे केंद्रीकरण आणि निर्माण होणारी भयानक विषमता अशा विविध चिंता अनाठायी नक्कीच नाहीत.

71 च्या पुनरावृत्तीचे संकेत

पाकव्याप्त काश्मीरात आज जे घडत आहे ते पाहून 1971 चा पूर्व पाकिस्तान आठवल्याशिवाय राहत नाही. तेव्हा याह्याखान यांच्या लष्कराने बंगाली जनतेवर अमानुष अत्याचार केले होते. ऑपरेशन सर्चलाईटच्या नावाखाली तीस लाख बंगालींना ठार केले. लाखो महिलांवर बलात्कार झाले. एक कोटी निर्वासित भारतात आले. आज त्याचीच पुनरावृत्ती पाकव्याप्त काश्मीर (पीओके) आणि गिलगिट-बाल्टिस्तानात होताना दिसत आहे. पूर्व पाकिस्तानातील अत्याचार जगाला कळायला काही काळ लागला. आज पीओकेमध्ये होणारे अत्याचार आधुनिक संपर्क माध्यमांमुळे थेट जगासमोर येतात. मुजफ्फराबाद, कोटली, रावळाकोट, गिलगिटमध्ये जनता महागाई, बेरोजगारी आणि वीजटंचाईविरोधात रस्त्यावर उतरली. गव्हाचे पीठ मिळेना, वीज दिवसाला एक तास, तरुणांना नोकऱ्या नाहीत. कारण पाकिस्तानने पीओकेला केवळ वसाहत बनवून ठेवले आहे. त्यांना त्या भागाविषयी आपलेपणा नाही. तिथली जंगले तोडून लाकूड पंजाबला जाते, तिथल्या पाण्यावर धरणे बांधून वीज लाहोरला जाते, तिथली खनिजे चीनला विकली जातात. सीपीईसीच्या नावाखाली स्थानिकांची जमीन बळकावली जाते. त्यामुळे या भागातील लोकांच्या मनात पाकिस्तानच्या सरकारच्या विरोधात तीव्र भावना उफाळून आल्या आहेत. त्यामुळे आंदोलन पेटले आहे. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर, वकिलांवर, व्यापाऱ्यांवर पाकिस्तानी रेंजर्स आणि एफसी थेट गोळ्या झाडत आहेत. घरे जाळली जात आहेत. लोक गायब होतात. त्यांचे मृतदेह नाल्यात फेकून दिले जातात. महिलांवर अत्याचार होतात. पीओकेतील हा प्रकार 1971 मधील पूर्व पाकिस्तानमधील अत्याचारांची आठवण करून देतो. लोकांचा उद्रेक चिरडताना, आम्ही देशद्रोही संपवत आहोत, असा दावा त्यावेळी पाकिस्तानी लष्कराचा होता. पीओकेमध्ये कारवाई करतानाही ते तसेच म्हणत आहेत. तेव्हा टार्गेट बंगाली हिंदू आणि अवामी लीगचे कार्यकर्ते होते, आज टार्गेट पहाडी, काश्मिरी आणि गिलगिटी जनता आहे. 1971 मध्ये भारताने पूर्वतयारी केली. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी जगभर फिरून पाकिस्तानचा बुरखा फाडला. निर्वासितांचे तळ दाखवले. निक्सन-किसिंजर जोडी पाकिस्तानच्या बाजूने होती तरी भारत डगमगला नाही. शेवटी मुक्ती वाहिनीला मदत केली आणि डिसेंबर 1971 मध्ये लष्करी कारवाई केली. नव्या बांगलादेशची निर्मिती केली. 93 हजार पाकिस्तानी सैनिकांनी शरणागती पत्करली. आता प्रश्

शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.

'ई' जीवनसत्त्वाची कमतरता



कमी चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला 'ई' जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.

लक्षणे :

स्नायू कमजोर होतात : ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या- फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.

दृष्टी कमी होणे : ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.



रक्ताची कमतरता : अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.

उन्हाळ्यात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...

उन्हाळ्यात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हाळ्यात बाहेर निघालं की शरीराची अक्षरश: लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हाळ्यात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...



जीन्स अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषून घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.

उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.

ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

अनेक जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो. सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮ सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮ आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮ केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.

▮ बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮ आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.

▮ टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮ मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮ गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮ वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮ तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.



केळी खाण्याचे असेही फायदे

फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळ्यात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळ्यात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळ्याचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळ्याचे जबरदस्त फायदे.



केळ्याचा रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील 'इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट' या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.

हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

अंडे तुमचे रक्षण करेल मधुमेह होण्यापासून



आजच्या घडीला कमी वयातच कित्येक लोकांना मधुमेह म्हणजे डायबेटिसचा त्रास होऊ लागला आहे. पण तुम्हाला जर अंडे खायला आवडत असेल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. तसे तर अंडे नेहमी खाल्ल्याने अनेक फायदे होतात. पण 'अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशन'मध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे समोर आले आहे की, एका आठवड्यात चार अंडी पुरुषांनी खाल्ली तर त्यांना टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आठवड्यातून एकच अंड खाणाऱ्या पुरुषापेक्षा ३७ टक्क्यांनी कमी होते. जगभरात टाइप-२ मधुमेह चांगला वेगाने पसरत असून वर्ष १९८४ ते १९८९ च्या मधील ४२ ते ६० वयोगटातील २,३३२ वयोवृद्ध लोकांच्या खाण्या-पिण्याच्य सवयींचे पूर्व फिनलंड विश्वविद्यालयातील संशोधकांनी मूल्यांकन केले. त्यानंतर १९ वर्षे त्यांचा फॉलोअप घेतल्यानंतर ४३२ लोकांना टाइप-२ मधुमेह झाल्याचे आढळले. अभ्यासातून समोर आले की, अंड्याचे सेवन केल्याने टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आणि रक्तात ग्लुकोज स्तर कमी झाला.

किचनमधील हे पदार्थ केवळ स्वाद नाही तर त्वचेची चमकदेखील वाढवतात

हरभरा पीठ आणि हळदीचा फेस पॅक

साहित्य :

▮ अर्धा किंवा एक चमचा हळद

▮ चार चमचे हरभरा पीठ

▮ दूध किंवा पाणी



वापरण्याची पद्धत :

▮ हरभरा पीठ आणि हळदीची पेस्ट बनवण्यासाठी पाणी किंवा दुधाचा वापर करा.

▮ ही पेस्ट चेहरा, मानेवर लावा आणि वाळू द्या. नंतर पाण्याने धुऊन घ्या.

▮ ही पेस्ट आठवड्यातून १ किंवा २ वेळा वापरली जाऊ शकते.

हे कसे कार्य करते?

हळदीत करक्युमिन नावाचे ॲंटीऑक्सिडेंट आढळतात आणि त्यात ॲंटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. हे त्वचेतील हानीकारक पदार्थ काढून आणि कोलेजनचे उत्पादन वाढवून त्वचेस तेजाळ करते.

टोमॅटो आणि चंदन पावडरचा फेस पॅक

पॅकसाहित्य :

अर्धा टोमॅटो, एक चमचा चंदन पावडर, चिमूटभर हळद



वापरण्याची पद्धत

▮ टोमॅटोमधील बिया काढाव्या.

▮ बिया नसलेल्या टोमॅटोत चंदनाची पावडर आणि हळद मिसळून त्याची पेस्ट करावी.

▮ ही पेस्ट चेहऱ्यावर लावून पंधरा मिनिटे तशीच राहू द्यावी. नंतर चेहरा पाण्याने स्वच्छ धुवावा.

▮ आठवड्यातून १ किंवा २ वेळा हा उपाय करता येऊ शकतो.



हे कसे कार्य करते?

टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी जास्त प्रमाणात असते, त्यामुळे चेहरा सतेज होतो.

साखरेमुळे होणारे नुकसान



साखर मानव जीवनातील अविभाज्य अंग आहे आणि तिचा गोडवा जितका हवा हवासा वाटतो तेवढेच ते नुकसानदायकही आहे. जर आपल्यालाही साखर खाण्याची सवय असेल तर यापासून होणारे पाच नुकसान जाणून घ्या :

मधुमेह : आपल्या परिवारात कोणालाही डायबेटिस असल्यास आपण साखर कमी करावी. कारण अनुवांशिक रूपात याचे सेवन मधुमेहाचे कारण बनू शकतं.

खाज : साखरेची अतिरिक्त मात्रा सेवन केल्याने गुप्तांगामध्ये खाज सुटण्याची तक्रार होते. याने गुप्तांगाहून अत्यधिक तरल स्राव आणि संक्रमण होण्याची शक्यताही असते.

हृदयरोग : अधिक साखरेमुळे हृदयनलिकेत चरबी जमा होऊन ती ब्लॉक होण्याची शक्यता असते. याने हार्ट ॲटॅकची शक्यता वाढते.

इसब : त्वचेवर अधिक साखर सेवन केल्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. एका संशोधनाप्रमाणे साखरेमुळे इसब होण्याची शक्यता वाढते.

कमजोर हाडे : साखरेमुळे हाडे कमजोर होतात आणि ऑस्टिओपोरोसिस रोग होण्याची शक्यता असते.

वजन कमी करायचे आहे? मग काकडीचे सेवन करा!

काकडीत खूप कमी प्रमाणात कॅलरी असतात. १०० ग्रॅम काकडीमध्ये ५४ कॅलरी ऊर्जा असते. म्हणूनच काकडी खाल्ल्यानं वजन वाढत नाही. काकडी ब्लड प्रेशर कमी करते, मात्र ब्लड प्रेशरचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी काकडीला मीठ लावून खाऊ नये. काकडी शरीरातील विषारी पदार्थ युरिनच्या माध्यमातून शरीराबाहेर काढते.



▮ सोबतच काकडीच्या ज्यूसमध्ये अशी काही पोषक तत्त्वे आहेत की ज्यामुळं बद्धकोष्ठता आणि ॲसिडिटीची समस्या दूर होऊ शकते.

▮ पचनक्रिया मजबूत करण्यासोबत काकडी गॅस्ट्रिक आणि छोट्या आतडीचा अल्सर झालेल्या रुग्णांसाठी औषध म्हणून काम करते.

▮ काकडीमध्ये ९६ टक्के पाणी असतं, जे की कोणत्याही कंपनीच्या बंद बाटलीच्या पाण्यापेक्षा चांगलं आणि शुद्ध असतं.

▮ काकडीमध्ये अल्कलिन फॉर्मिंग (क्षार) मिनरल्स असतात, म्हणूनच त्याचा वापर ब्युटी प्रॉडक्ट्समध्येही प्रयोग केला जातो. यात ॲंटीऑक्सिडंटचं काम करणारे व्हिटॅमिन ए, सी, मॅंगनिज, पोटॅशियम, सिलिका आणि सल्फर असते.

▮ ताप आल्यास काकडीचा ज्यूस प्यावा. त्यामुळे शरीराचं तापमान नियंत्रणात राहतं.

▮ जर अपचनाचा त्रास होत असेल तर जेवणासोबत सॅलड म्हणून काकडी खावी.

▮ काकडी गोल कापून डोळ्यावर ठेवल्यास डोळ्यांची जळजळ कमी होते. दररोज सॅलड म्हणून काळं मीठ, काळीमिरी आणि लिंबू पिळून काकडी खावी. काकडीची कोशिंबिरही बनवून आपण खाऊ शकता.

जाणून घ्या पाणी पिण्याचे नियम

सध्या बरेच जण कामाच्या व्यापातून पाणी पिणे विसरुन जातात. त्यामुळे त्याचा आरोग्यावर परिणाम होतो. कारण शरीराला पाणी फार महत्त्वाचे असते. मात्र, पाणी पिण्याचे काही नियम पाळल्यास त्याचा अधिक फायदा होतो. चला तर जाणून घेऊया पाण्याचे नियम

सकाळी उठल्यावर उपाशीपोटी कोमट पाणी प्यावे. यामुळे तुमचा मेटॅबॉलिझम रेट सुधारेल आणि वजन कमी होईल. पाणी पिण्याची ही पद्धत हृदयाला निरोगी ठेवण्यात सहायक ठरते. त्यानंतर ब्रश करुन ज्लायानंतर एक ग्लास पाण्याचे सेवन करा. याने पचनक्रिया चांगली राहते. पाणी पिल्याच्या अर्ध्या तासानंतरच काहीतरी खावे. पाणी वेगाने पिऊ नये. जेवण करण्याच्या एक तास आधी पाणी प्यावे आणि जेवण झाल्याच्या दोन तासांपर्यंत पाणी पिऊ नये. यामुळे मेटॅबॉलिझम वाढतो आणि वजन कमी करण्यातही भरपूर मदत होते. पाण्याचे सेवन हळूहळू करावे. जर तुम्ही घाई-घाईत पाणी पीत असाल तर त्याचा पचनक्रिया आणि भुकेवर परिणाम होतो. उभे राहून पाणी पिल्याने शरीराचे लिक्विड बॅलन्स बिघडते. यामुळे शरीराच्या सांध्यांना पुरेसे पाणी मिळत नाही. तसेच संधिवाताचा त्रास होऊ शकतो.



१. जर कोरड्या भाजीत जास्त मीठ झाले तर आपण थोडं हरभरा डाळी चे पीठ भाजून भाजीत घाला. थोड्या वेळात, भाजीची चव देखील ठीक होईल आणि ती अधिक चवदार लागेल.

२. रसदार भाजीत मीठ जास्त झाले असल्यास त्यात थोडं पाणी घालून उकळवून घ्या. उशीर होत असेल तर भाजीत कणकेच्या गोळ्या घालू शकता. या मुळे मीठ कमी होईल.

३. बऱ्याच हिवाळा चायनीज फूड मध्ये मीठ जास्त झाले असल्यास त्यात थोडस लिंबाचा रस मिसळा.अन्नातून मीठ कमी होईल आणि चव चांगली राहील.

४. बऱ्याच वेळा रसदार भाजीत उकडलेला बटाटा देखील घालू शकता. ऐकण्यात विचित्र वाटत असेल तरी हे प्रभावी आहे. या मुळे भाजीतील किंवा वरणातील मीठ कमी होईल

५. अन्न सर्व्ह करताना शेवटच्या क्षणी कळते की भाजीत मीठ जास्त झाले आहे या साठी आपण भाजीत ब्रेडचा तुकडा घाला आणि सर्व्ह करताना हळूच काढून घ्या.

भाजीत मीठ जास्त झाले असल्यास या ५ टिप्स अवलंबवा



तांदळाचे हे आहेत अनेक फायदे



डोकेदुखीचा त्रास होत असल्यास शिजलेल्या भाताच्या पाण्यात एक चिमूट सुंठ पावडर मिसळून डोक्यावर लावा. यामुळे डोकेदुखीपासून सुटका होते.

जुलाबाचा त्रास होतो दूर : जुलाबाचा त्रास होत असल्यास तांदूळ बारीक वाटून घेऊन ते पाण्यात उकळवा. यात मीठ टाकून ही पेज प्या. यामुळे जुलाबाचा त्रास कमी होतो.

सतत तहान लागणे : सतत तहान लागत असेल तर तांदळाचे दाणे दिवसातून दोन-तीन वेळा चावून चावून खा. यामुळे तहान लागणे कमी होते.



चेहऱ्यावरील डाग दूर होतात : चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी उपयोगी आहे तांदूळ. तांदूळ बारीक वाटून घ्या. वाटलेल्या तांदळाच्या पिठामध्ये थोडेसे पाणी मिसळून ही पेस्ट चेहऱ्यावर हलक्या हाताने लावा. यामुळे चेहऱ्यावरील डाग दूर होतात.

डोकेदुखीसाठी फायदेशीर :

पाऊस लांबल्याने रत्नागिरीत पाणी संकट

अवघा पंचवीस दिवसांचा पाणीसाठा शिल्लक

निसर्गाने समृद्ध असलेल्या जिल्ह्यात सध्या काही गावांमध्ये निर्माण झालेली पाण्याची परिस्थिती तात्पुरती असली, तरी पावसाचे आगमन लांबल्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.



■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

निसर्गाने समृद्ध असलेल्या जिल्ह्यात सध्या काही गावांमध्ये निर्माण झालेली पाण्याची परिस्थिती तात्पुरती असली, तरी पावसाचे आगमन लांबल्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. नागरिकांनी विहिरी, विंधन विहिरी आणि नळाच्या पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी केले आहे.

पाणी बचतीचा हा निर्णय प्रशासनाला सहकार्य म्हणून प्रत्येक नागरिकाने पाळावा, अशी अपेक्षा त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित पाणीटंचाई नियोजनाच्या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीत व्यक्त केली. या बैठकीत जिल्ह्यातील धरणांमधील उपलब्ध साठा, इतर स्रोतामधील पाणीसाठा आणि आवश्यक पाणीपुरवठा याबाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील काही शहरांसाठी पुढील २५ ते ३० दिवस पुरेल इतकाच पिण्याचा पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती नगरपरिषद आणि पंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांनी दिली.

नगरपालिका, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि एमआयडीसीने आपापल्या क्षेत्रातील गावांचे सर्वेक्षण करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उपलब्ध स्रोत आणि टँकरने करावा लागणारा पुरवठा याबाबतचा अहवाल आजच सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.


पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे नियोजन करण्याचे स्पष्ट करत जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, रिसॉर्ट्स आणि होम स्टे यांचे जलतरण तलाव असतील, तर त्यांचा नॉन-फूड रिलेटिव्ह पाणीपुरवठा त्वरित थांबवावा. लोटे एमआयडीसी परिसरातील नागरिक आणि बाहेरून आलेल्या कामगारांच्या पिण्याच्या पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन एमआयडीसी असोसिएशनने आपली मागणी कार्यालयाकडे नोंदवावी, जेणेकरून त्याचे योग्य नियोजन करता येईल. सार्वजनिक पाणीस्रोतांच्या ५०० मीटर परिसरामध्ये असणारे इतर पाण्याचे सोर्स किती आहेत, याची माहिती जल आराखड्यात समाविष्ट करण्याची सूचनाही त्यांनी दिली.

पहिली वातानुकूलित डबलडेकर बस अखेर रस्त्यावर

चार्जिंग सुविधेच्या समस्येनंतर पर्यायी व्यवस्था, सर्कल-भाईंदरपाडा मार्गावर धावली

महाराष्ट्र दिनानिमित्त लोकार्पण करण्यात आलेली ठाणे परिवहन सेवेची पहिली वातानुकूलित इलेक्ट्रिक डबलडेकर बस अखेर ठाणेकरांच्या सेवेत दाखल झाली आहे.



■ठाणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्र दिनानिमित्त लोकार्पण करण्यात आलेली ठाणे परिवहन सेवेची पहिली वातानुकूलित इलेक्ट्रिक डबलडेकर बस अखेर ठाणेकरांच्या सेवेत दाखल झाली आहे. चार्जिंग स्टेशनच्या तांत्रिक अडचणीमुळे जवळपास महिनाभर घोडबंदर रोडवरील आनंदनगर आगारात निष्क्रिय अवस्थेत उभी असलेली ही बस महापालिकेच्या हस्तक्षेपानंतर पर्यायी व्यवस्था उपलब्ध झाल्याने आता नियमितपणे रस्त्यावर धावू लागली आहे. कोपरी येथील विद्यमान चार्जिंग स्टेशनवर इतर इलेक्ट्रिक बस चार्ज होत असल्या, तरी डबलडेकर बसची प्रणाली वेगळी असल्याने तेथे चार्जिंग शक्य नव्हते. डबलडेकर बससाठी पर्यायी चार्जिंग सुविधा उपलब्ध करण्याबाबत त्यांनी परिवहन अधिकाऱ्यांना आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

भविष्यात एकूण दहा बस दाखल होणार

महापौरांच्या निदेर्शानंतर परिवहन प्रशासनाने चार्जिंगची पर्यायी व्यवस्था उभी केल्यानंतर अखेर १५ जूनपासून ही बस नियमित सेवेत दाखल झाली. दरम्यान, ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात लवकरच आणखी एक वातानुकूलित इलेक्ट्रिक डबलडेकर बस दाखल होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पहिल्या टप्प्यात दोन डबलडेकर बस शहरात धावणार असून, भविष्यात अशा एकूण दहा बस ताफ्यात समाविष्ट करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रवाशांसाठी आकर्षणाचा विषय

सध्या बस २२ नंबर सर्कल ते भाईंदरपाडा या मार्गावर धावत असून सकाळी ८ ते दुपारी १२ आणि दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दुमजली रचना, वातानुकूलित सुविधा, प्रशस्त आसनव्यवस्था आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानामुळे या बसला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः घोडबंदर रोड परिसरातील प्रवाशांसाठी ही सेवा आकर्षणाचा विषय ठरत असून अनेक नागरिक डबलडेकर बसमधून प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसून येत आहे.

बोगस नोटा डिपॉझिट करुन बँकेला फसवण्याचा प्रयत्न

मुंबईतील दादर परिसरातील प्रकार



■मुंबई। प्रतिनिधी,

एटीएममध्ये बोगस नोटा डिपॉझिट करुन एका नामांकित बँकेची फसवणुकीचा प्रयत्न मुंबईत उघड झाला आहे. मुंबईच्या दादर परिसरात हा प्रकार झाला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच बँकेचे खातेदार मिलिंद मोहन बंदरकर याला दादर पोलिसांनी अटक केली असून याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत आहे. त्याच्याकडून पोलिसांनी सुमारे पाच लाख रुपयांच्या पाचशेच्या बोगस नोटा जप्त केल्या आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर आवारी यांनी दिली.

यातील तक्रारदार प्रभादेवीमधील एका नामांकित बँकेत व्यवस्थापक म्हणून काम करतात. गेल्या महिन्यांत त्यांची पुण्याहून प्रभादेवी शाखेत बदली झाली होती. १८ मे रोजी ते बँकेत रुजू झाले होते. दुर्सया दिवशी बँकेच्या एटीएमची कॅश आणण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना 500 रुपयांच्या 100 बोगस नोटा आढळल्या. अज्ञात व्यक्तीने 50 हजार रुपयांच्या बोगस नोटा डिपॉझिट करुन बँकेची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच बँकेच्या पोर्टलवरुन संबंधित खातेदाराची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात ते बोगस नोटा मिलिंद बंदरकर याने डिपॉझिट केल्याचे उघडकीस आले. तो करीरोडच्या महादेव पालव मार्ग, महादेव निवास चाळीत राहत होता.

या नोटा बोगस असल्याची माहिती असताना मिलिंदने त्या नोटा डिपॉझिट करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्याच्याविरुद्ध बँकेच्या वतीने तक्रारदारांनी दादर पोलिसांत तक्रार केली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच त्याला पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. चौकशीत त्याने कुर्ला येथून 5 लाख रुपयांच्या 500 रुपयांच्या बोगस नोटा विकत घेतल्याचे सांगितले. या नोटा एटीएम मशीनमध्ये डिपॉझिट करुन बँकेची फसवणूक करण्याची त्याची योजना होती, टप्याटप्याने तो या नोटा एटीएममध्ये डिपॉझिट करणार होता. मात्र पहिल्याच प्रयत्नात त्याची योजना फसली गेली. त्याच्याकडून बँकेसह उर्वरित 500 रुपयांच्या पाच लाखांच्या बोगस नोटा पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

मुंबईत ऑटोरिक्षा चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश... 12 रिक्षांसह दोन आरोपी अटकेत



■मुंबई। प्रतिनिधी,

खेरवाडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ऑटोरिक्षा चोरी करणाऱ्या टोळीचा पदार्फाश करत दोन सराईत आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीस गेलेल्या 12 ऑटोरिक्षा जप्त करण्यात आल्या असून सुमारे 8 लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या अनेक गुन्ह्यांची उकल झाली आहे. खेरवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसांपासून सीसीटीव्ही नसलेल्या भागांमधून ऑटोरिक्षा चोरीच्या घटना घडत होत्या. 15 जून रोजी बांद्रा पूर्व येथील कार्डिनल स्कूलसमोरील रस्त्यावर उभी असलेली एक ऑटोरिक्षा चोरीस गेल्याची तक्रार दाखल झाली होती. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर मो. इक्बाल सिरताजअली शेख उर्फ लकी (वय 23) आणि मो. फरीद मिराजअली हाशमी (वय 20) हे दोघे संशयित आढळले. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी त्यांच्यावर पाळत ठेवली. तपासादरम्यान आरोपी चोरीच्या ऑटोरिक्षांचा वापर बांधकाम साईटवरील भंगार चोरीसाठी करत असल्याचे समोर आले. काम पूर्ण झाल्यानंतर चोरीच्या रिक्षा निर्जनस्थळी लपवून ठेवल्या जात असल्याची माहितीही पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार वाकोला पाइपलाइन परिसरात सापळा रचून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान त्यांनी खेरवाडी, निर्मलनगर, वाकोला आणि विलेपार्ले परिसरातील अनेक ऑटोरिक्षा चोरी केल्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपींकडून एकूण 12 ऑटोरिक्षा जप्त केल्या. या कारवाईमुळे खेरवाडी, निर्मलनगर, वाकोला आणि विलेपार्ले पोलीस ठाण्यांतील एकूण 10 हून अधिक गुन्ह्यांची उकल झाली आहे. तपासात मुख्य आरोपी मो. इक्बाल शेख उर्फ लकी याच्यावर यापूर्वीही दरोडा, चोरी आणि इतर गुन्ह्यांचे अनेक दाखले असल्याचे समोर आले आहे. पोलिसांकडून आरोपींची अधिक चौकशी सुरू असून या टोळीचा इतर गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे का, याचाही तपास केला जात आहे. ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली खेरवाडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.



खाकी वर्दीला बट्टा!

तक्रार दाखल करण्यास गेलेल्या महिलेवर पोलिसाकडून अत्याचार

जमिनीच्या वादावर तोडगा काढण्यासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या एका महिलेनं पोलिसाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला. जमिनीच्या वादावरून पीडित महिला न्याय आणि मदतीच्या आशेने पोलिसांकडे गेली होती, मात्र एका पोलीस अधिकाऱ्याने तिच्यावर अत्याचार केला.

■मुंबई। प्रतिनिधी,

ओडिशाच्या नयागढ जिल्ह्यात पोलीस प्रशानाला काळिमा फासणारा प्रकार उघडकीस आला. जमिनीच्या वादावर तोडगा काढण्यासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या एका महिलेनं पोलिसांनी लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला. संबंधित पोलीस हा ओडिशातील सारणकुल पोलीस ठाण्यातील असल्याचा आरोप आहे. पीडितेचं म्हणणं असं की, ती जमिन प्रकरणाच्या न्याय आणि मदतीच्या आशेने पोलिसांकडे गेली होती, मात्र तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले.

मदतीचे आमिष दाखवून पोलिसाकडून महिलेवर लैंगिक अत्याचार

महिलेनं केलेल्या तक्रारीनुसार, जमिनीच्या वादावर चर्चा झाली होती, अशातच सारणकुल पोलीस ठाण्यात गेल्यानंतर ठाणेदार सुजित कुमार दास यांनी महिलेला मदतीचे आमिष दाखवून भाड्याच्या घरात बोलावले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

कोणाला सांगितल्यास हत्या करण्याची दिली धमकी

पीडितेनं असा आरोप केला की, घटनेनंतर आरोपी अधिकाऱ्याने जर तिने या घटनेबाबत कोणाला सांगितल्यास मृत्यूदंडासह गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली. भीती आणि दबावाने काही काळ शांतच राहिली होती, नंतर या प्रकाराबाबत पीडितेनं घटनेबाबतची तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाने परिसरात एकच खळबळ उडाली होती.

पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आरोपांमुळे पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. स्थानिक रहिवाशांनी या प्रकरणावरून संताप व्यक्त केला आहे. आरोपी पोलीस ठाण्याचे प्रभारी सुजित कुमार दास यांचा जबाब घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा मोबाईल फोन बंद लागला होता. त्यांनी पुन्हा कोणताही प्रतिसाद दिला नाही.

दरम्यान, नयागढचे पोलीस अधीक्षकांनी प्रकरणाची चौकशी सुरू असल्याची माहिती दिली. संबंधित आरोप खरे ठरल्यास आरोपीवर कारवाई केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.



नराधमानं मुलीचं तोंड दाबून उसाच्या शेतात नेलं अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तराखंडच्या हरिद्वार जिल्ह्यातील लक्सरमध्ये माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. एका तरुणाने मुलीला शेतात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तिचा शोध घेत तिची बहीण घटनास्थळी पोहोचली असता, ती हतबल झाली. कुटुंबीयांच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी नराधमाविरूद्ध पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

नेमकं काय घडलं?

लक्सर कोतवाली परिसरात एका गावातील महिलेनं पोलिसांना या घटनेची माहिती दिली, तिची 11 वर्षांची पीडित मुलगी ही घटनास्थळी पोहोचल्यानंतर पीडितेची परिस्थिती पाहून ती पूर्णपणे हादरून गेली. मुलगी गावातील सरकारी शाळेजवळ खेळताना हा धक्कादायक प्रकार घडला होता.

मुलीचे तोंड दाबून उसाच्या शेतात नेत लैंगिक अत्याचार

अशातच गावातील एक तरुणाने मुलीचे तोंड दाबून तिला जवळच्या उसाच्या शेतात नेले, नंतर आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या घटनेदरम्यान पीडितेच्या मामाची मुलगी ही घटनास्थळी आली असता, तिने पीडितेची परिस्थिती पाहिली आणि तिला मोठा धक्का बसला.

आरोपीविरूद्ध पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

मामाच्या मुलीचा हाक ऐकून पीडित मुलगी शेतातून अत्यंत गंभीर अवस्थेत बाहेर पडली होती. पीडिता घरी पोहोचल्यानंतर तिने आपल्या कुटुंबीयांना तरुणीच्या कृत्याबाबत सांगितलं. महिलेनं आरोपी तरुणाविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, या घटनेनं पूरता परिसर हादरून गेला होता. दरम्यान, पोलीस निरीक्षक प्रवीण सिंह कोश्यारी यांनी सांगितलं की, तक्रारीच्या आधारे आरोपीविरूद्ध पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. संबंधित प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



सातवीच्या विद्यार्थिनीला 5 जणांनी कारमध्ये बसवलं अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

भोजपूर सहार पोलीस ठाणे परिसरात इयत्ता सातवीत शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर सामूहिक लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. नारळपाणी आणण्यास बाहेर गेलेल्या पीडित विद्यार्थिनीला चार ते पाच मुलांनी जबरदस्ती करत जंगलात नेले. संबंधित घटनेची माहिती मिळताच आरोपींच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

पीडितेच्या विनयभंगाचा निषेध करणाऱ्या काकांवर शस्त्राने हल्ला

बिहारच्या मुझफ्फरपूर जिल्ह्यातील गुन्हेगारांनी मोठं कांड केलं. औराई पोलीस ठाणे परिसरातील एका गावात पीडितेच्या विनयभंगाचा निषेध करणाऱ्या काकांवर धारदार शस्त्राने हल्ला केला. मुलीच्या काकांना गंभीर जखमी झालेल्या अवस्थेत पाहून कुटुंबीयांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले.

पीडित विद्यार्थिनीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर, पोलीस आरोपीची ओळख पटवत आहे.

पीडितेला चारचाकी गाडीत बसवून जंगलात नेले अन्...


रविवारी दुपारी, विद्यार्थीनी तिच्या गावातून सहार बस स्टँडवर नारळपाणी आणण्यास गेली होती. घरी परतण्यासाठी ती एका टेम्पोची वाट पाहू लागली होती. तेव्हा तिच्याच गावातील एका तरुणासह चार मुलं तिथे आली आणि तिला जबरदस्तीने चारचाकी गाडीत बसवले आणि जंगलात नेलं, नंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केले, या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्रसारमाध्यमानुसार, पीडितेनं आरोपींना ओळखले आहे. घृणास्पद कृत्याने पीडित मुलगी कशीबशी घरी पोहोचली आणि तिने घडलेला सर्व प्रकार आपल्या कुटुंबाला सांगितला, त्यांनी पोलीस ठाणे गाठून तक्रार केली. या प्रकरणी आरोपींवर कारवाई सुरू आहे.

पतीच्या 'त्या' गोष्टीला कंटाळली अन शेवटी २२ वर्षीय विवाहितेनं आत्महत्या केली

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साक्षी वैभव गोरे (वय २२) असे मृत विवाहितेचे नाव असून वैभव रावसाहेब गोरे (वय २३) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साक्षी ही निफाड तालुक्यातील रामनाथ दत्तू पगार यांची एकुलती एक मुलगी. एप्रिल २०२४ मध्ये मोठ्या कुटुंबाने मोठ्या आनंदात तिचा विवाह वैभव गोरे या तरुणासोबत लाऊन दिला होता. संसाराच्या नव्या वाटेवर पाऊल ठेवताना तिनेही इतर मुलींप्रमाणे सुखी आयुष्याची स्वप्ने पाहिली. मात्र, पदरी निराशा पडली. लग्नानंतर काही दिवसांतच तिच्या आयुष्यात निराशेचे ढग दाटू लागले. फिर्यादीनुसार, वैभव गोरे याचे धुवनगर परिसरातील एका महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याचे साक्षीला समजले. या प्रकारामुळे ती मानसिकदृष्ट्या खचून गेली होती. संसार टिकावा, नातेसंबंध सुधारावेत आणि पतीने आपले वर्तन बदलावे यासाठी साक्षीने अनेकदा प्रयत्न केले. तिच्या माहेरच्या कुटुंबीयांनीही वैभवची वारंवार समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचा काहीही परिणाम झाला नाही असा आरोप करण्यात आला आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

नाशिकमध्ये घडलेल्या एका धक्कादायक घटनेनं सर्वांनाच हादरा बसला आहे. नव्या संसाराची स्वप्ने डोळ्यांत साठवून सासरी गेलेल्या २२ वर्षीय विवाहितेने अखेर जीवनालाच पूर्णविराम दिला आहे. याचं कारणही तितकंच धक्कादायक आहे. शहरातील ध्रुवनगर परिसरातील जिजामाता कॉलनी (शिवाजीनगर) येथे घडली आहे. पतीच्या अनैतिक संबंधांमुळे सतत मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याने या विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे.



'मला इथून घेऊन जा...'

मंगळवारी (१६ जून) दुपारी साक्षीने तिच्या मामाला फोन करून मनातील वेदना व्यक्त केल्या होत्या. पती पुन्हा संबंधित महिलेच्या घरी गेल्याचे आपण स्वतः पाहिल्याचे तिने सांगितले. यानंतर तिचा आणि त्या महिलेचा वादही झाला होता. मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचलेल्या साक्षीने मामाला, "तुम्ही काहीही करा, पण मला इथून तातडीने घेऊन जा," अशी विनंती केल्याचे फियार्दीत नमूद करण्यात आले आहे. फोनद्वारे केलेला हा तिच्या आयुष्यातील शेवटचा संवाद ठरला. काही वेळानंतर दुपारी दोनच्या सुमारास साक्षीने राहत्या घरात गळफास घेतल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

एकुलत्या एका मुलीच्या जाण्याने कुटुंबावर शोककळा

साक्षी ही आई-वडिलांची एकुलती एक मुलगी होती. तिच्या निधनामुळे संपूर्ण कुटुंबावर शोककळा पसरली आहे. मुलीचा संसार सुखाचा व्हावा यासाठी आई-वडिलांनी केलेली स्वप्ने एका क्षणात भंगली. या घटनेने परिसरातही हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, गंगापूर पोलीस स्टेशनमध्ये पोलिसांनी फियार्दीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



13 वर्षीय मुलाने 9 वर्षीय मुलीला मंदिरामागे नेत...

उत्तराखंडच्या पुरोला ब्लॉकमधील एका गावातील 13 वर्षीय मुलाने इयत्ता 4 थी मध्ये शिक्षण घेणाऱ्या 9 वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला. ही घटना बुधवारी दुपारी घडली असल्याची माहिती समोर आली. पोलिसांच्या माहितीनुसार, विद्यार्थीनींच्या वडिलांच्या तक्रारीवरून कायदेशीर कारवाई केली असता, विद्यार्थ्याला वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले.

मंदिराच्या मागे मुलीवर विनयभंग

बुधवारी पीडितेची आई ही जवळच्या गावातील जत्रेत गेली होती. तिचे वडील शेतात काम करत होते. मुलगी आणि मुलगा गावातील मंदिरात खेळताना, मुलानेच मुलीला मंदिराच्या मागील बाजूस नेलं आणि तिच्यावर विनयभंग केला. जेव्हा विद्यार्थिनीचे वडील कामावरून घरी परतले तेव्हा ती रक्ताच्या थारोळ्यात माखलेली आढळून आली होती.

पीडितेला रुग्णालयात दाखल केले

चौकशी केल्यानंतर मुलीने तिच्या कुटुंबीयांना घडलेल्या घटनेची माहिती दिली. पीडितेची अस्वस्थता पाहून तिला पुराळा उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले आणि पोलिसांना या घटनेची माहिती दिली. ठाणेदार दीपक सिंह कथायत यांनी माहिती दिली की, दोघेही अल्पवयीन असून, वडिलांनी पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीवरून कायदेशीर कारवाई केली. पीडितेची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर प्रकरण उघडकीस आले. संबंधित मुलाची पुढील चौकशी सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com